सायरन

गुरुवार दि.७ ऑगस्ट २०२५

# भिकमचंद खंडेलवाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात सायबर सुरक्षा विषयावर कार्यशाळा संपन्न

**● विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा विषयक माहिती आत्मसात करत जागरूकतेचा संदेश घेतला**

« अकोला | प्रतिनिधी »





भिकमचंद खंडेलवाल विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या विषयावर विद्याथ्यांसाठी एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेत शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयाच्या सायबर वॉरियर्स सुमित संजय सपकाळ आणि यश भालेराव यांनी विद्यार्थ्यांना मोबाईल आणि इंटनेटच्या चुकीच्या वापरामुळे सायबर गुन्हे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत या विषयी महत्त्वपूर्ण माहिती सांगितली. मोबाईल चा अती वापर टाळावा, सतत मोबाईल गेम्स खेळल्या मुळे कसे वाईट परिणाम होतात, व्हॉट्सप, इंस्टाग्राम, फेसबुक, ए टी एम, व्हॉईस क्लोनिंग आणि फेक वेबसाइट्सच्या माध्यमातून कशी फसवणूक होते आणि या पासून आपण कसे सुरक्षित राहावे या विषयी सविस्तर मार्गदर्शन केले. सेटिंग मधून टू स्टेप व्हेरिफ्फिकेशन करावे, (https://) सेक्युरीटी सर्टिफिकेट असलेल्याच वेबसाईटला विझिट करावे अशा सुरक्षा टिप्स विद्याथ्यांना सांगितल्या आणि माहितीपत्रक वाटप केले. कार्यशाळेत विद्याथ्यांच्या शंकांचे निरसन करून मोबाईलचा योग्य उपयोग करण्यासाठी शपथ दिली. ही कार्यशाळा शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला चे प्राचार्य डॉ. जे. एम. साबू सर , समन्वयक डॉ.दीप्ती पेटकर म्याम यांच्या सहयोगाने आणि विद्यालयाचे प्राचार्य श्री देशपांडे सर आणि राठोड सर यांच्या परवानगीने आयोजित केली होती. यावेळी शिरभाते सर,वर्घट म्याम,सकारकर सर आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्याथी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी सायबर सुरक्षा विषयक माहिती आत्मसात करत जागरूकतेचा संदेश घेतला.

दैनिक सायरन अकोला ,वाशिम, बुलडाणा, यवतमाळ, अमरावती, हिंगोली येथून एकाचवेळी प्रकाशित